महाराष्ट्र शासन
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, अमरावती
मोर्शी रोड, अमरावती ४४४ ६०३.
www.amravati.dvet.gov.in e-mail:jtdir.amaravati@dvet.gov.in
Section email est.roamt@dvet.gov.in Phone No.(0721)2666048 (Personal) 2666186.

क्र. प्राकाअम/आस्था/अ-४/जेष्ठतासुची/२०२६/**७८३५** दिनांक:- **०३/११/२०२६**

वाचा:- १) शासन अधिसुचना, सामान्य **प्रशासन** विभाग शासन राजपत्र, असाधारण भाग चार-अ, असाधारण क्रमांक ९८, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक २१/०६/२०२१
३) या कार्यालयाचे परिपत्रक **क्रमांक** प्राकाअम/आस्था-४/तात्पुरतीजेष्ठतासुची/२०२६/११८ दिनांक ०८/०१/२०२६
३) या कार्यालयाचे परिपत्रक **क्रमांक** प्राकाअम/आस्था-४/२०२६/२३९२ दिनांक २०/०४/२०२६
४) मा. संचालनालयाचे **परिपत्रक** क्रमांक व्यशिप्र-२०२६/आस्था-३/प्र.क्र.४/ ज्येसू/का-४ दि २२/०९/२०२६

परिपत्रकः

या परिपत्रकान्वये **सर्व** संस्था प्रमुखांना कळविण्यांत येते की, या **कार्यालयाच्या** अधिपत्याखालील शासकीय संस्था / कार्यालया मध्ये दिनांक **०१/०१/२०२५ ते दिनांक ३१/१२/२०२५ पर्यत** कार्यरत असलेल्या **वर्ग-३ पदातील गटनिदेशक** या संवर्गात, सरळसेवेने, पदोन्तीने नियुक्ती झालेल्या **कर्मचा**-यांची **दिनांक ०१/०१/२०२६** रोजीची जेष्ठतेची **स्थिती** दर्शविणारी **तात्पुरती** जेष्ठतासूची वाचा शासन अधिसूचना १ व २ अन्वये प्रसिध्द करण्यांत आली होती. तसेच **संदर्भ** क्र.३ अन्वये दि. ०१/०१/२०२६ रोजीची अंतिम **जेष्**ठता सुची प्रसिध्द करण्यात आली होती.

संदर्भ क्रमांक ४ चे संचालनालयाचे परिपत्रकान्वये श्री. सदानंद वि. गावंडे व इतर ११ यांनी मुळ अर्ज ५३८/२०२१ अन्वये मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर येथे दाखल याचिकेवर मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर यांनी दिलेल्या दिनांक १२/०९/२०२५ रोजीचा अंतिम **निर्णयान्वये** प्रादेशिक स्तरावरील संबंधीत जेष्ठतासूचीमध्ये **प्रस्तुत** जेष्ठतेनुसार कार्यवाही करण्यात येवून सुधारीत **तात्पुरती** सेवा जेष्ठता प्रसिध्द करण्यात येत आहे.

आपल्या कार्यालयात **कार्यरत** असलेल्या संबंधित कर्मचा-यांना सदर **जेष्ठता** सुचीची प्रत आपल्या स्तरावर उपलब्ध करुन देऊन त्यांची पोच कार्यालयाच्या दप्तरी ठेवण्यात यावी व तसे या **कार्यालयास** कळविण्यात यावे

संबंधिताकडून **जेष्ठता** सुची प्राप्त केल्याबद्दल पोच घ्यावी. तसेच त्यांनी सदरची जेष्ठतासूची तपासून जेष्ठतासूची बाबत त्यांच्या काही तक्रारी हरकती असल्यास त्या बाबतची निवेदने / **अर्ज** हया कार्यालयास / संस्था प्रमुखां मार्फत कोणत्याही **परिस्थितीत** परिपत्रकाचे दिनांकापासून १५ दिवसाचे आत संबंधीता कडून घेऊन ते या कार्यालयास सादर करावीत. या विहित कालावधीनंतर प्राप्त होणारे कोणतेही अर्ज अथवा निवेदने विचारार्थ स्विकारण्यांत येणार नाहीत या बाबत संबंधितांना आपल्या स्तरावरुन सुचित करावे. **सर्व** संस्था / कार्यालय प्रमुखांना कळविण्यांत येते की, त्यांचे **संस्थेतील** कर्मचा-यांनी जेष्ठतासूची बाबत घेतलेले **आक्षेप** सेवापुस्तके वा इतर अभिलेख्यावरुन तपासून पुराव्यासह खालील प्रपत्रामध्ये या कार्यालयास सादर करावीत.

प्रपत्र

अ.क्र.	जेष्ठता क्र.	कर्मचा-यांचे नांव	चुकीची नोंद	बरोबर नोंद	जोडलेले आवश्यक पुरावे
१	२	३	४	५	६

या परिपत्रकाची व जेष्ठतासुचीची पोच द्यावी.

(अनंत सोमकुवर)
प्र.सहसंचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
प्रादेशिक कार्यालय, अमरावती.

प्रतिलीपी, माहीती तथा आवश्यक कार्यवाहीकरीता.

१) मा. संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई-१ कार्यासन क्रमांक ११ यांना माहितीकरीता सविनय सादर.
२) सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, नागपुर/औरंगाबाद/पुणे/मुंबई/ नाशिक.
३) जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय, अमरावती/अकोला/यवतमाळ/बुलढाणा/वाशिम.
४) प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, (सर्व)
५) मुख्याध्यापक, शा.मा.शाळा. केंद्र (सर्व)
६) अंशकालीन प्राचार्य, मुलभत सुचना व अनुषांगिक सुचना केंद्र (सर्व)
७) अ-१/अ-२/अ-३/अ-४/अ-५/अ-६/विभाग, लेखा, नियोजन, प्रशिक्षण विभाग प्रादेशिक कार्यालय, अमरावती.
८) सौ. बि. एम. वानखडे, कॉम्प्यूटर प्रोग्रामर, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, अमरावती यांना अंतिम जेष्ठता सूची या कार्यालयाच्या https://amaravati.dvet.gov.in या संकेत स्थळांवर प्रसिध्द करण्याकरीता अग्रेषित.